11 JUL 2021

**तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पी. एस. पाटील टॉप संशोधकांच्या यादीत

## फोटोकॅटॅलिसीस, सौरघटावर संशोधन : देशात दुसरे स्थान

प्रतिनिधी
कोल्हापूर

फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठातील ज्येष्ठ संशोधक तथा प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील जागतिक संशोधकांच्या यादीत 'टॉप-१५०' मध्ये तर देशातील संशोधकात दुसऱ्या स्थानी आहेत. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील त्यांचे संशोधनपर लेखन देशात सर्वाधिक वाचले गेले आहे. त्यांच्या संशोधनाला ३७०८ इतक्या व्ह्यूज



प्राप्त झाले आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा-२०१६-२०२१' मधून त्यांचे हे स्थान अधोरेखित झाले आहे.

डॉ. पी. एस. पाटील यांची मटेरिअल सायन्स, नॅनोसायन्स, फोटोकॅटॅलिसिस, सोलर सेल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांतील संशोधनात जगभरातील टॉप संशोधकांमध्ये गणना केली जाते. काही काळापूर्वीच जाहीर झालेल्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या २ टक्के संशोधकांमध्येही त्यांचे नाव आघाडीवर आहे. 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग'मध्येही डॉ. पाटील यांचे नाव अग्रस्थानी होते. तसेतच 'स्कोपस' डाटाच्या आधारे केवळ फोटोकॅटॅलिसिस व सोलर सेल क्षेत्रात कार्य करणाऱ्या जगभरातील आघाडीच्या ५०० संशोधकांचा 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा' जाहीर करण्यात आला. या यादीमध्ये डॉ. पाटील १४७ व्या स्थानी आहेत. त्यांच्यावर १३१ व्या स्थानी ओडिशा येथील आय. टी. ई. आर. शिक्षा 'ओ' अनुसंधान या संस्थेचे डॉ. के. एम. परिदा हे आहेत. भारतीय संशोधकांच्या यादीत डॉ. पारिदा हे प्रथम तर डॉ. पाटील हे द्वितिय आहेत.

भारतीय संशोधकांच्या 'टॉप-५००' च्या यादीमध्ये विद्यापीठातील अन्य सात संशोधकांनाही स्थान प्राप्त झाले आहे. यामध्ये डॉ. व्ही. एल. पाटील, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. जी. दोड्डमणी, डॉ. ए. व्ही. मोहोळकर आणि डॉ. एन. एल. तरवाळ यांचा समावेश आहे.

> प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची संशोधन क्षेत्रातील कामगिरी ही चमकदार राहिली आहे. त्यांचे कार्य हे अभिनंदनीय आहेच. त्यांच्या बरोबरीने विद्यापीठाच्या अन्य सात संशोधकांनीही देशातल्या आघाडीच्या ५०० संशोधकांत स्थान मिळविले, यातूनही विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा सिद्ध होतो.
>
> **डॉ. डी. टी. शिर्के**
> **(कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)**

### गेल्या पाच वर्षातील कष्टाचे फळ

शिवाजी विद्यापीठ गेल्या अनेक वर्षापासून फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट क्षेत्रांमध्ये भरीव संशोधन करीत आहे. या संशोधनात आपण सातत्याने आघाडी टिकवून आहोत. गेल्या पाच वर्षातील वाटचालीचे हे फलित आहे. भविष्यातही व्यक्तीगत संशोधक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून संशोधन परंपरा अखंडित पुढे चालवणे महत्त्वाचे आहे.

**डॉ. पी. एस. पाटील (प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)**

11 JUL 2021

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पाटील यांची आंतरराष्ट्रीय मोहोर

## जगातील टॉप १५० शास्त्रज्ञांत समावेश; संशोधनाला ३७०८ व्ह्यूज



डॉ. पाटील

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली. या विषयात संशोधन करणाऱ्या जगातील १५० शास्त्रज्ञांत त्यांचा समावेश झाला आहे. याच विषयातील देशांतर्गत यादीत डॉ. पाटील यांचा दुसरा क्रमांक आहे. त्यांच्या संशोधनाला ३७०८ इतक्या व्ह्यूज प्राप्त झाल्या असून 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा- २०१६-२०२१' या यादीमध्येही त्यांचे हे स्थान अधोरेखित झाले आहे.

स्कोपस डाटाच्या आधारे केवळ फोटोकॅटिलिसिस व सोलर सेल विषयात संशोधन करणाऱ्या जगभरातील ५०० संशोधकांचा समावेश असणारा एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा' जाहीर करण्यात आला. या यादीमध्ये डॉ. पी.एस. पाटील १४७व्या स्थानी आहेत. यांच्या वर १३१व्या स्थानी ओडिशा येथील आय.टी.ई.आर. शिक्षा 'ओ' अनुसंधान या संस्थेचे डॉ. के.एम. पारिदा आहेत. भारतीय संशोधकांच्या यादीत डॉ. पारिदा हे प्रथम स्थानी तर डॉ. पाटील द्वितीय स्थानी आहेत. डॉ.पी.एस.पाटील यांच्या संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेल्याने लौकिकात भर पडली आहे.

**डॉ.पाटील यांचे संशोधन कार्य**

डॉ. पी. एस. पाटील यांची मटेरिअल सायन्स, नॅनोसायन्स, फोटोकॅटॅलिसीस, सोलर सेल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांतील संशोधनासाठी जगभरातील आघाडीच्या संशोधकांमध्ये गणना केली जाते. काही काळापूर्वीच जाहीर झालेल्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या २ टक्के संशोधकांमध्येही त्यांचे नाव आघाडीवर होते. त्याचप्रमाणे 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग'मध्येही डॉ. पाटील यांचे नाव अग्रस्थानी होते. डॉ. पी. एस. पाटील यांचा स्कॉलरली आऊटपुट ८३ असून त्यांच्या संशोधनाला देशात सर्वाधिक ३७०८ व्ह्यूज प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा फिल्ड-वेटेड सायटेशन इम्पॅक्ट १.९१ इतका असून सायटेशन काऊंट १७२६ आहे.

> **शिवाजी विद्यापीठात फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट या क्षेत्रामध्ये भरीव संशोधन अनेक वर्षांपासून सुरू आहे. या क्षेत्रात आपण सातत्याने आघाडी टिकवून आहोत. या पुढील काळातही संशोधक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ही संशोधन परंपरा अखंडित पुढे चालवित राहणे महत्त्वाचे आहे. केवळ विद्यापीठातीलच नव्हे, तर जगभरात पसरलेले विद्यापीठाचे विद्यार्थीसुद्धा योगदान देत आहेत.**
> **- डॉ. पी. एस. पाटील,** प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

> **प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची संशोधन क्षेत्रातील कामगिरी सातत्याने चमकदार राहिली आहे. अन्य सात संशोधकांनीही देशातल्या आघाडीच्या ५०० संशोधकांत स्थान मिळविले. यातूनही विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा सिद्ध होतो. या संशोधकांसह समस्त संशोधक, विद्यार्थ्यांनी संशोधकीय कारकीर्दीत सातत्य राखून असे अनेक मानसन्मान प्राप्त करावेत.**
> **- प्रा. डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

11 JUL 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव ऑनलाईन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील यंदाचा युवा महोत्सव ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. जिल्हानिहाय महोत्सवाच्या तारखा निश्चित झाल्या असून, सोमवारपासून सांगली जिल्ह्याच्या युवा महोत्सवाला सुरुवात केली आहे. कोल्हापूर, सातारा जिल्ह्याच्या तारखा निश्चित झाल्या आहेत, परंतू कोणत्या कॉलेजमध्ये आयोजन करायचे यासंदर्भातील तारख्या निश्चित झालेल्या नाहीत.

- सांगली जिल्ह्याचा युवा महोत्सव उद्यापासून
- कोल्हापूर, साताऱ्याच्या युवा महोत्सव तारखा लवकरच जाहीर

कोरोच्या पार्श्वभूमीवर जमावबंदीला मर्यादा आल्याने विद्यार्थ्यांना उत्सुकता असलेला युवा महोत्सव साजरा होणार का नाही याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. गतवर्षीही युवा महोत्सव झालाच नाही. यंदा मात्र ऑनलाईन पध्दतीने युवा महोत्सव होणार आहे. परंतू ऑफलाईन युवा महोत्सवात ज्याप्रमाणे सांस्कृतिक, वैचारिक देवाण-घेवाणीबरोपार मैत्रीचे संबंध वाढत होते, यावर मात्र मर्यादा येणार असल्याने विद्यार्थ्यांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सांगली जिल्ह्याचा युवा महोत्सव १२ ते १४ या कालावधीत वाळवा तालुक्यातील इस्लामपूरमधील मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयात होणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन सोमवार १२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि अभिनेत्री नमिता पाटील यांच्या हस्ते होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन झाल्यावर रांगोळी, वक्तृत्व, शास्त्रीय गायन, व्यंगचित्र, शास्त्रीय सुरवाद्य हे कलाप्रकार होणार आहेत. दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी भितीचित्र, शास्त्रीय नृत्य, सुगम गायन, कातरकाम, एकपात्री अभिनय, मेहंदी, पाश्चिमात्य वाद्य वादन, मातीकाम, एकल गायन, नकला आदी स्पर्धा होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUL 2021
लोकमत

# मोहोळकर यांना आंतरराष्ट्रीय रिसर्च एक्सलन्स पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क,
**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



पदार्थविज्ञान अधिविभागातील संशोधक डॉ. अण्णासाहेब मोहोळकर यांची 'इंटरनॅशनल रिसर्च व सायन्स, हेल्थ अँड इंजिनिरिंग ' अर्थात सायन्स फादर संस्थेच्या 'आंतरराष्ट्रीय रिसर्च एक्सलन्स' पुरस्कारासाठी निवड झाली. ही संस्था दरवर्षी विज्ञान शाखेत उत्तम कामगिरी बजावणाऱ्या संशोधकांचा विविध पुरस्कार प्रदान करून गौरव करते. डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली.

त्यांना व्हिनस इंटरनॅशनल संस्थेमार्फत या वर्षीचा 'मटेरियल सायन्स विशेषज्ज्ञ' पुरस्कारही जाहीर झाला आहे. डॉ. मोहोळकर यांनी विविध विषयांवर पेटंट मिळविले आहेत. शिवाजी विद्यापीठातून पीएच.डी. पदवी घेतल्यानंतर दक्षिण कोरियातून पोस्ट डॉक्टरेट केले. २००९ साली बॉईजकास्ट फेलो म्हणून भारतातून ७२, तर महाराष्ट्रातून दोघांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी ते एक आहेत. सध्या ते काही आघाडीच्या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांचे संपादक आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUL 2021
पुढारी

# विद्यापीठाचा युवा महोत्सव ऑनलाईन

## जिल्हास्तरीयला १२ जुलैपासून प्रारंभ; १९ कला प्रकारांचा समावेश



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ४० वा युवा महोत्सव पहिल्यांदाच ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. १२ जुलैपासून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांत जिल्हास्तरीय युवा महोत्सवास सुरुवात होणार आहे. महोत्सवात १९ कला प्रकारांचा समावेश असणार आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यावर्षीच्या युवा महोत्सवांतर्गत जिल्हा व मध्यवर्ती ऑनलाईन युवा महोत्सवाच्या तारखा निश्चित केल्या आहेत. त्यानुसार १२, १३ व १४ जुलै रोजी न्यू कॉलेज, कोल्हापूर, मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण यांच्यामार्फत जिल्हास्तरीय युवा महोत्सव घेतला जाणार आहे.

> जिल्हास्तरीय युवा महोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य व समन्वयक यांना व्हीसीद्वारे सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील यजमान महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेतली आहे. रविवारी ऑनलाईन बैठक घेऊन परीक्षकांना सूचना दिल्या जाणार आहेत.
>
> **- डॉ. आर. व्ही. गुरव,**
> विद्यार्थी विकास विभागाचे संचालक

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सुमारे ९०० हून विद्यार्थी कलाकार व कोल्हापूर (५४), सांगली (३४) व सातारा (३२) येथील महाविद्यालये महोत्सवात सहभागी होणार आहेत. महोत्सवात वक्तृत्व स्पर्धा, सुगम गायन, शास्त्रीय गायन, पाश्चिमात्य एकलगायन, नकला, एकपात्री, व्यंगचित्र, कातरकाम, मातीकाम, रांगोळी, मेंहदी आदी कला प्रकारांचा समावेश असणार आहे. १५, १६ व १७ जुलै रोजी वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड यांच्यामार्फत मध्यवर्ती ऑनलाईन युवा महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUL 2021
पुढारी

# डॉ. मोहोळकर यांना आंतरराष्ट्रीय रिसर्च एक्सलन्स पुरस्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागातील संशोधक डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांची 'इंटरनॅशनल रिसर्च व सायन्स, हेल्थ अँड इंजिनिअरिंग' अर्थात 'सायन्स फादर' संस्थेच्या 'आंतरराष्ट्रीय रिसर्च एक्सलन्स' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली आहे. त्यांना गतवर्षी अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने घेतलेल्या सर्वेक्षणात जागतिक क्रमवारीत टॉप २ टक्के शास्त्रज्ञांच्या यादीमध्ये स्थान मिळाले होते. यावर्षी 'एडी सायंटिफिक' या संस्थेच्या सर्वेक्षणात जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत त्यांना स्थान लाभले आहे. त्यांना 'व्हिनस इंटरनॅशनल' संस्थेमार्फत यावर्षीचा 'मटेरियल सायन्स विशेषज्ज्ञ' पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. मोहोळकर यांनी विविध विषयांवर पेटंट मिळवले आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर १७५ हून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. त्यांचा संदर्भ आधार जगभरातून ६८०० हून अधिक संशोधकांनी शोधनिबंधांमध्ये घेतला आहे. त्यांनी दीड कोटींचे आठ मोठे संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUL 2021
सकाळ

# आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी डॉ. मोहोळकर यांची निवड



डॉ.मोहोळकर

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठातील संशोधक प्रा. डॉ. अण्णासाहेब मोहोळकर यांची निवड 'आंतरराष्ट्रीय रिसर्च एक्सलन्स' या पुरस्कारासाठी झाली. इंटरनॅशनल रिसर्च व सायन्स, हेल्थ अँड इंजिनीरिंग' संस्थेतर्फे पुरस्कार दिला जातो. सायन्स फादर अशी या संस्थेची विशेष ओळख आहे. ही संस्था दरवर्षी विज्ञान शाखेत उत्तम कामगिरी बजावणाऱ्या संशोधकांचा पुरस्कार प्रदान करून गौरव करते. डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागात डॉ. मोहोळकर प्राध्यापक आहेत. विद्यापीठातून पीएच.डी. पदवी घेतल्यानंतर त्यांनी दक्षिण कोरियातून पोस्ट डॉक्टरेट केले. २००९ मध्ये बॉईजकास्ट फेलो म्हणून देशातून ७२ जणांची तर महाराष्ट्रातून दोघांची निवड केली होती. यामध्ये मोहोळकरांचा समावेश होता. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर १७५ हून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. त्यांचा संदर्भ आधार जगभरातून ६८०० हून अधिक संशोधकांनी शोधनिबंधांमध्ये घेतला आहे. सध्या ते काही आघाडीच्या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांचे संपादक व रिव्ह्यूअर म्हणून काम पाहतात. त्यांनी दीड कोटीचे आठ मोठे संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. विद्यार्थ्यांच्या अंगी संशोधन अभिवृत्ती निर्माण व्हावी व समाजातील प्रश्न घेऊन विज्ञान व संशोधनाच्या माध्यमातून ते सोडविण्यासाठी डॉ. मोहोळकर पुढाकार घेतात. त्यांनी अनेक गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना परदेशांत पोस्ट डॉक्टरेट करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या नावे पेटंटची नोंदही आहे.

11 JUL 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पी. एस. पाटील टॉप संशोधकांच्या यादीत

## फोटोकॅटॅलिसीस, सौरघटावर संशोधन : देशात दुसरे स्थान

प्रतिनिधी
कोल्हापूर

फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठातील ज्येष्ठ संशोधक तथा प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील जागतिक संशोधकांच्या यादीत 'टॉप-१५०' मध्ये तर देशातील संशोधकात दुसऱ्या स्थानी आहेत. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील त्यांचे संशोधनपर लेखन देशात सर्वाधिक वाचले गेले आहे. त्यांच्या संशोधनाला ३७०८ इतक्या व्ह्यूज



प्राप्त झाले आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा-२०१६-२०२१' मधून त्यांचे हे स्थान अधोरेखित झाले आहे.

डॉ. पी. एस. पाटील यांची मटेरिअल सायन्स, नॅनोसायन्स, फोटोकॅटॅलिसिस, सोलर सेल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांतील संशोधनात जगभरातील टॉप संशोधकांमध्ये गणना केली जाते. काही काळापूर्वीच जाहीर झालेल्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या २ टक्के संशोधकांमध्येही त्यांचे नाव आघाडीवर आहे. 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग'मध्येही डॉ. पाटील यांचे नाव अग्रस्थानी होते. तसेतच 'स्कोपस' डाटाच्या आधारे केवळ फोटोकॅटॅलिसिस व सोलर सेल क्षेत्रात कार्य करणाऱ्या जगभरातील आघाडीच्या ५०० संशोधकांचा 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा' जाहीर करण्यात आला. या यादीमध्ये डॉ. पाटील १४७ व्या स्थानी आहेत. त्यांच्यावर १३१ व्या स्थानी ओडिशा येथील आय. टी. ई. आर. शिक्षा 'ओ' अनुसंधान या संस्थेचे डॉ. के. एम. परिदा हे आहेत. भारतीय संशोधकांच्या यादीत डॉ. पारिदा हे प्रथम तर डॉ. पाटील हे द्वितिय आहेत.

भारतीय संशोधकांच्या 'टॉप-५००' च्या यादीमध्ये विद्यापीठातील अन्य सात संशोधकांनाही स्थान प्राप्त झाले आहे. यामध्ये डॉ. व्ही. एल. पाटील, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. जी. दोड्डमणी, डॉ. ए. व्ही. मोहोळकर आणि डॉ. एन. एल. तरवाळ यांचा समावेश आहे.

### गेल्या पाच वर्षांतील कष्टाचे फळ

शिवाजी विद्यापीठ गेल्या अनेक वर्षांपासून फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट क्षेत्रांमध्ये भरीव संशोधन करीत आहे. या संशोधनात आपण सातत्याने आघाडी टिकवून आहोत. गेल्या पाच वर्षांतील वाटचालीचे हे फलित आहे. भविष्यातही व्यक्तीगत संशोधक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून संशोधन परंपरा अखंडित पुढे चालवणे महत्त्वाचे आहे.

**डॉ. पी. एस. पाटील (प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)**

> प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची संशोधन क्षेत्रातील कामगिरी ही चमकदार राहिली आहे. त्यांचे कार्य हे अभिनंदनीय आहेच. त्यांच्या बरोबरीने विद्यापीठाच्या अन्य सात संशोधकांनीही देशातल्या आघाडीच्या ५०० संशोधकांत स्थान मिळविले, यातूनही विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा सिद्ध होतो.
>
> **डॉ. डी. टी. शिर्के**
> **(कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)**

11 JUL 2021
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पाटील यांची आंतरराष्ट्रीय मोहोर

## जगातील टॉप १५० शास्त्रज्ञांत समावेश; संशोधनाला ३७०८ व्ह्यूज



डॉ. पाटील

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली. या विषयात संशोधन करणाऱ्या जगातील १५० शास्त्रज्ञांत त्यांचा समावेश झाला आहे. याच विषयातील देशांतर्गत यादीत डॉ. पाटील यांचा दुसरा क्रमांक आहे. त्यांच्या संशोधनाला ३७०८ इतक्या व्ह्यूज प्राप्त झाल्या असून 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा- २०१६-२०२१' या यादीमध्येही त्यांचे हे स्थान अधोरेखित झाले आहे.

स्कोपस डाटाच्या आधारे केवळ फोटोकॅटिलिसिस व सोलर सेल विषयात संशोधन करणाऱ्या जगभरातील ५०० संशोधकांचा समावेश असणारा एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा' जाहीर करण्यात आला. या यादीमध्ये डॉ. पी.एस. पाटील १४७व्या स्थानी आहेत. त्यांच्या वर १३१व्या स्थानी ओडिशा येथील आय.टी.ई.आर. शिक्षा 'ओ' अनुसंधान या संस्थेचे डॉ. के.एम. पारिदा आहेत. भारतीय संशोधकांच्या यादीत डॉ. पारिदा हे प्रथम स्थानी तर डॉ. पाटील द्वितीय स्थानी आहेत. डॉ.पी.एस.पाटील यांच्या संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेल्याने लौकिकात भर पडली आहे.

**"शिवाजी विद्यापीठात फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट या क्षेत्रामध्ये भरीव संशोधन अनेक वर्षांपासून सुरू आहे. या क्षेत्रात आपण सातत्याने आघाडी टिकवून आहोत. या पुढील काळातही संशोधक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ही संशोधन परंपरा अखंडित पुढे चालवित राहणे महत्त्वाचे आहे. केवळ विद्यापीठातीलच नव्हे, तर जगभरात पसरलेले विद्यापीठाचे विद्यार्थीसुद्धा योगदान देत आहेत.**
**- डॉ. पी. एस. पाटील**, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

**"प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची संशोधन क्षेत्रातील कामगिरी सातत्याने चमकदार राहिली आहे. अन्य सात संशोधकांनीही देशातल्या आघाडीच्या ५०० संशोधकांत स्थान मिळविले. यातूनही विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा सिद्ध होतो. या संशोधकांसह समस्त संशोधक, विद्यार्थ्यांनी संशोधकीय कारकीर्दीत सातत्य राखून असे अनेक मानसन्मान प्राप्त करावेत.**
**- प्रा. डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

**डॉ.पाटील यांचे संशोधन कार्य**

डॉ. पी. एस. पाटील यांची मटेरिअल सायन्स, नॅनोसायन्स, फोटोकॅटॅलिसीस, सोलर सेल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांतील संशोधनासाठी जगभरातील आघाडीच्या संशोधकांमध्ये गणना केली जाते. काही काळापूर्वीच जाहीर झालेल्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या २ टक्के संशोधकांमध्येही त्यांचे नाव आघाडीवर होते. त्याचप्रमाणे 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग'मध्येही डॉ. पाटील यांचे नाव अग्रस्थानी होते. डॉ. पी. एस. पाटील यांचा स्कॉलरली आऊटपुट ८३ असून त्यांच्या संशोधनाला देशात सर्वाधिक ३७०८ व्ह्यूज प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा फिल्ड-वेटेड सायटेशन इम्पॅक्ट १.९१ इतका असून सायटेशन काऊंट १७२६ आहे.